निफ्टीची विक्रमी घोडदौड

१० हजारांचा टप्पा ओलांडला, सेन्सेक्सही उच्चांकी

म. टा. खास प्रतिनिधी मुंबई

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीने बुधवारी बाजार बंद होतेवेळी १० हजार अंकांचा टप्पा ओलांडून नवा विक्रम प्रस्थापित केला. त्याचप्रमाणे मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्सही नव्या उच्चांकावर बंद झाला. सेन्सेक्स व निफ्टी यांची ही घोडदौड सर्वांना अचंबित करून गेली. बुधवारी, दोन्ही शेअर बाजारांवर सर्वसामान्य किंवा रिटेल गुंतवणूकदारांचे वर्चस्व स्पष्टपणे पहायला मिळाले.

कंपन्यांचे तिमाही आर्थिक निकाल सध्या येत आहेत. त्याआधारे गुंतवणूक करण्याबरोबरच म्युच्यअल फंडांचा आधार घेत सर्वसामान्य गुंतवणूकदारांनी प्रचंड प्रमाणात भांडवलाचा ओघ शेअर बाजारात सुरू ठेवल्यामुळेच या दोन्ही निर्देशांकांनी उच्चाक गाठले. दिवसअखेर निफ्टी ५६.१० अंक वर जात १००२०.६५ या स्तरावर बंद झाला. सेन्सेक्स १५४.१९ अंक वधारत ३२३८२.४६ या पातळीवर बंद झाला.

निफ्टीसाठी धातू कंपन्यांच्या समभागांनी निर्देशांक वधारण्यामध्ये सर्वाधिक योगदान दिले. चीनमधून मोठ्या प्रमाणावर मागणी वाढल्याचा तसेच रुपयाच्या तुलनेत डॉलर अशक्त झाल्याचा फायदा या क्षेत्राला मिळाला. वेदान्तचा समभाग २.३३ टक्के वाढला. टाटा स्टील, जिंदाल स्टील अँड पॉवर व हिंदुस्थान झिंक याचे समभाग ८.३७ टक्क्यांपर्यंत वधारले. गुंतवणूकदारांनी ब्लू-चिप कंपन्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली.

सेन्सेक्सला वर नेण्यात सन फार्मा, आयसीआयसीआय बँक, महिंद्र अँड महिंद्र, हिंदुस्थान युनिलिव्हर, सिप्ला व एनटीपीसी यांनी मोठे योगदान दिले. या कंपन्यांचे समभाग २.१२ टक्क्यांपर्यंत वधारले. हिरो मोटोकॉर्पचे शेअर्स ०.२१ टक्के तर येस बँकेचे समभाग ६.१० टक्के वर गेले.

बाजार वधारण्याची कारणे

जीएसटी : यावर्षी जीएसटी देशभर लागू झाला. राज्यांतर्गत व्यापार सोपा झाल्यामुळे व्यवसायविस्तारावर जीएसटीने शिक्कामोर्तब केले.

छोटे गुंतवणूकदाक सक्रिय : छोट्या किंवा सर्वसामान्य गुंतवणूकदारांनी भांडवल बाजारात उतरण्यासाठी उत्साह दाखवला आणि त्यासाठी म्युच्युअल फंडांना हाताशी धरले. एसआयपीद्वारे सर्वसामान्य गुंतवणूकदारांनी वर्षाला सुमारे ६० हजार कोटी रुपये भांडवल बाजारात गुंतवले आहेत.

प्रचंड भांडवल तरलता : यावर्षी आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी भारतीय शेअर बाजारात एक लाख ६० हजार कोटी रुपये गुंतवले आहेत. गेल्या वर्षी या गुंतवणूकदारांनी केवळ २७ हजार कोटी रुपये गुंतवले होते.

निफ्टी १० हजारांवर गेल्यावर राष्ट्रीय शेअर बाजारात (एनएसई) विशेष घंटानाद करण्यात आला. त्यावेळी एनएसईचे एमडी व सीईओ विक्रम लिमये यांच्यासह आयआयएसएलचे अध्यक्ष एल. रवि शंकर व सीईओ मुकेश कुमार अगरवाल, एनएसईचे समूह अध्यक्ष जे. रविचंद्रन तसेच डॉटएक्सचे अध्यक्ष पी. एच. रविकुमार उपस्थित होते.

सावध करा सौदे

- एकदम मोठी गुंतवणूक शेअर बाजारात करू नये.
- हाती असलेला सर्व पैसा शेअर बाजारात न गुंतवता काही पैसा राखीव ठेवावा.
- चांगल्या कंपन्या (पूर्वेतिहास, आर्थिक निकाल इत्यादी पाहून) शोधून, त्यांत गुंतवणूक करा.
- विमान कंपन्या, पायाभूत सुविधा, बिगरबँक वित्तसंस्था (एनबीएफसी), एनपीएनंतर सावरलेल्या बँका, औषधे, पोलाद (स्टील), वाहन उद्योगाला पूरक कंपन्या या क्षेत्रांतून केलेली गुंतवणूक लाभदायक ठरणार.

पुढे काय?

भांडवल बाजारतज्ज्ञ केदार ओक यांच्या मते, शेअर बाजारांची कामगिरी भावी काळातही चांगलीच असेल. निफ्टी चालू वर्षअखेर १२ हजार अंकांची पातळी गाठेल. सहा महिन्यांत जीएसटीचे परिणाम दिसू लागतील. येत्या काळात शेअर बाजारात ४ ते ७ टक्के करेक्शन येऊ शकते. अर्थात, असे करेक्शन आल्यावर त्यामुळे निर्देशांक पडणार नाही, असा दिलासाही केदार ओक यांनी दिला आहे.

भारत ही सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असून निफ्टी हे त्याचे प्रतिबिंब आहे. निफ्टी वधारण्यामध्ये सर्व भागधारकांचा, ट्रेडिंग मेंबर्सचा, गुंतवणूकदार संस्थांचा, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या चमूचा तसेच भांडवल बाजार नियंत्रकाचा मोठा वाटा आहे. देशाची अर्थव्यवस्था मध्यम तसेच दीर्घ काळात विकास करेल, याबद्दल मी आशावादी आहे.

- विक्रम लिमये, एमडी व सीईओ, राष्ट्रीय शेअर बाजार

फ्लिपकार्टकडे स्नॅपडिलची मालकी?

नवी दिल्ली : फ्लिपकार्ट या ई-कॉमर्स कंपनीने स्नॅपडिल ही कंपनी खरेदी करण्याची तयारी दाखवली असून ९५० दशलक्ष डॉलरला हा व्यवहार होणार आहे. मात्र यासाठी स्नॅपडिलच्या भागधारकांची मंजुरी मिळणे अद्याप बाकी आहे. या भागधारकांमध्ये रतन टाटा, फॉक्सकॉन, ब्लॅकरॉक व प्रेमजीइन्व्हेस्ट सारखे मोठे भागधारकही आहेत.

स्नॅपडिलमध्ये सर्वाधिक गुंतवणूक असलेल्या सॉफ्टबँकेकडून स्नॅपडिलच्या विक्रीचे प्रयत्न काही महिन्यांपासून सुरू आहेत. स्नॅपडिलचे संस्थापक कुणाल बहल व रोहित बन्सल यांना कंपनी इन्फिबिमला विकण्यात स्वारस्य आहे.

दोन हजारच्या नोटेबाबत संभ्रम

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

नव्याने चलनात आणलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटा रद्द करून एक हजार रुपयांची नाणी चलनात आणण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे का, दोनशे रुपयांची नोट चलनात येणार आहे का, याबाबत केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी बुधवारी विरोधी पक्षांनी राज्यसभेत केली. दरम्यान, जेटली हे सभागृहात उपस्थित असूनही विरोधकांच्या या मागणीवर त्यांनी काही प्रतिक्रिया दिली नाही. त्यामुळे दोन हजारांची चलनातून काढून टाकणार का याबाबत संभ्रम कायम राहिला आहे.

दोन हजाराची नोट चलनातून बाद करण्यात येणार असल्याचे बोलले जात असले तरी सरकारकडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. या नोटांची छपाई कमी करण्यात आली आहे. त्याऐवजी दोनशे रुपये मूल्याची नोट चलनात येणार आहे. ही नोट पुढील महिन्यापासून चलनात येईल, असेही बोलले जात आहे. यालाही सरकारकडून पुष्टी मिळालेली नाही. त्यामुळे विरोधी पक्षांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले.

विरोधी पक्षनेते गुलाब नबी आझाद म्हणाले, 'हजार रुपयांच्या नाण्यांसंबंधी वाचण्यात येते. अर्थमंत्र्यांनी याबाबतीतील सत्यता स्पष्ट करावी.'

८१ एसईझेड रद्द

नवी दिल्ली : मान्यता मंडळाने ८१ विशेष आर्थिक क्षेत्रांची (एसईझेड) मंजुरी काढून घेतली आहे. यामुळे हे सर्व एसईझेड रद्द झाले आहेत. ही माहिती केंद्रीय उद्योगमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. आर्थिक मंदी, बाजारपेठेकडून अल्प प्रतिसाद व एसईझेडमधील जागांना भाव न मिळणे या कारणांमुळे हे एसईझेड रद्द करण्यात आले आहेत.

आता या क्षेत्रांची उभारणी करणाऱ्या विकासकांना एसईझेडसाठी मिळालेली शुल्कमाफी व करांचे फायदे सरकारला परत करावे लागणार आहेत. ही मोकळी झालेली जागा आता पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरली जाणार आहे.

शंकासमाधान

मृताच्या वारसाबद्दल सुस्पष्टता हवी

हाउसिंग सोसायटी
ॲड. राजीव वाघ
ज्येष्ठ वकील

● आम्ही दोन बहिणी आणि एक भाऊ. आमच्या वडिलांचं जानेवारी २०१६ मध्ये निधन झाले. त्यांनी २००३ साली नालासोपारा येथे एक फ्लॅट विकत घेतला होता. तेव्हापासून फ्लॅट भाड्याने दिला होता आणि सोसायटीचे सेक्रेटरीच फ्लॅट आणि भाडेकरूंचे बघत होते. आईच्या नावाने फ्लॅट करण्याची प्रक्रिया नेमकी काय आहे? कारण आम्ही सगळी कागदपत्रे देऊनही सेक्रेटरीचे म्हणणे आहे की त्यांनी नामांकन (नॉमिनेशन) न केल्यामुळे कोणाचा आक्षेप नाही हे जाणून घेण्यासाठी वृत्तपत्रात जाहीर नोटिस प्रसिद्ध करावी लागेल. आम्ही सगळ्या मुलांनी ना हरकत दाखलेही (एनओसी) दिले आहेत. मी काही जणांशी चर्चा केली तेव्हा ते अशी नोटिस प्रसिद्ध करण्याची काहीही आवश्यकता नाही, असे म्हणाले. मात्र सेक्रेटरी त्यावर ठाम असून त्यानंतर ते सोसायटीत सर्वसाधारण सभा घेणार आहेत. त्यांनी आम्हाला फ्लॅट रजिस्टरही करायला सांगितला आहे. फ्लॅट खरेदी करतेवेळीच रजिस्टर केलेला होता. त्यांनी हस्तांतरण फी भरण्याचीही गरज असल्याचे म्हटले आहे.

- जयश्री जाधव

सेक्रेटरीची भूमिका कायद्यानुसार आणि तात्विक आधारही नसलेली आहे. दिवंगत पतीची मालमत्ता पत्नीच्या नावे करण्यासाठी जाहिरात देणे हे अनिवार्य नसून ऐच्छिक आहे. दिवंगताच्या वारसाबद्दल सुस्पष्टता नसेल तर त्या संदर्भात सोसायटी जाहिरातीचा आग्रह धरू शकते. तुमची आई त्यांची पत्नी नसल्याचा किंवा तुम्ही त्यांची मुलं नसल्याबद्दल सेक्रेटरीला शंका आहेत का? तसे नसेल तर फ्लॅट तुमच्या आईच्या नावे करण्यास कोण आक्षेप घेऊ शकतो?

शिवाय, नामांकन नसल्यामुळे जाहिरात द्यावी लागेल या सेक्रेटरीच्या दाव्यालाही कायद्याचा आधार नाही. तुम्ही तिन्ही मुलांनी ना हरकत दाखले दिल्यानंतर फ्लॅट त्वरीत तुमच्या आईच्या नावे करणे हे सोसायटी आणि सेक्रेटरीचे कायदेशीर कर्तव्य आहे. तसेच, फ्लॅट दुसऱ्यांदा रजिस्टर करण्याची आवश्यकता नाही.

करारावर शिक्कामोर्तब होऊन एकदा नोंदणी झाली की विषय संपला. तुमच्या दिवंगत पित्याकडून आईकडे सदस्यत्व हस्तांतर करताना कोणतेही शुल्क लागू होत नाही. अशी मागणी करून सेक्रेटरी स्वत:साठी किंवा सोसायटीकरिता पैसे उकळू पाहात आहेत असे दिसते.

● माझे बाबा २०१६ साली वारले ते असताना दोन घर घेतली होती एक मुंबई ला व एक सांगली ला आईच्या नावावर दोन्ही घर घेतली होती बाबा वापरल्यावर आई मुंबईला राहावयास गेली त्या मुंबईच्या घरात आधीपासून माझी मोठी बहीण राहत आहे मी दुसऱ्या राज्यात राहतो आई माझ्याकडेची राहते. व तिची काळजी मीच घेत असल्याने सगळ्या मालमत्तांवर माझा हक्क आहे असे तिचे सांगणे आहे. आईचे वय ८० आहे. ती सतत आजारी असल्याचा फायदा घेऊन तिने जर आईची सही घेऊन घर नावावर करून घेतले तर मला काही मिळणार नाही का ?

- जयेश नातू

आईची म्हातारपणी तुम्ही काळजी घेता त्यामुळे तुमच्या आईच्या मालमत्तेवर तुमचा अधिकार आहे या गृहितकाला कोणताही कायदेशीर आधार नाही. आपल्या पालकांची वृद्धापकाळात काळजी घेणे हे प्रत्येक मुलाचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य आहे. त्याचा मालमत्तेवरच्या अधिकाराशी काहीही संबंध नाही. व्यक्तीची मालमत्ता मृत्युपत्राद्वारे किंवा वारसाहक्काद्वारे हस्तांतरीत होते.

याचा अर्थ एखादी व्यक्ती आपले मृत्युपत्र तयार करून आपल्या मालमत्तेचा निकाल लावू शकते किंवा त्याचे कायद्यानुसार सर्व वारसांत समान वाटप केले जाते. तुमच्या आईने मृत्युपत्र तयार केले तर त्यात उल्लेख केलेल्या व्यक्तीला ती मालमत्ता जाईल किंवा वारसांत ती समानपणाने वाटली जाईल.

केजरीवाल यांना १० हजारांचा दंड

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या उलटतपासणीत आक्षेपार्ह भाषा वापरल्याप्रकरणी उत्तर सादर न केल्याने दिल्ली उच्च न्यायालयाने बुधवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना १० हजारांचा दंड ठोठावला. शिवाय उलटतपासणीच्या नावाखाली जेटलींबाबत आक्षेपार्ह भाषा वापरता येणार नाही, असेही ठणकावले.

दिल्ली क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष असताना जेटलींनी भ्रष्टाचार केल्याचा आरोप केजरीवाल आणि आपच्या पाच नेत्यांनी केला होता. हे आरोप फेटाळून जेटली यांनी त्यांच्याविरुद्ध अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. या प्रकरणात जेटलींची उलटतपासणी करताना केजरीवाल यांचे वकील राम जेठमलानी यांनी जेटलींना प्रश्न विचारताना आक्षेपार्ह भाषा वापरली होती.

जेठमलानींनी वकीलपत्र सोडले

जेटली यांच्याविरुद्ध असभ्य भाषा वापरण्यास परवानगी दिली नसल्याचे लेखी पत्र केजरीवाल यांनी न्यायालयात दिल्यानंतर राम जेठमलानी यांनी त्यांचे वकीलपत्र सोडले; तसेच आजवर झालेल्या ११ सुनावणींचे दोन कोटींचे बिलही केजरीवाल यांना पाठविले आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
बांधकाम विभाग
निविदा सूचना क्र. ५७ (२०१७-१८)

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कामांकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बी-१ नमुन्यात १२ कामांची निविदा मागवित आहे.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटी शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्राचे **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर दि. २७/०७/२०१७ ते दि. ०३/०८/२०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या निविदा ह्या दि. ०३/०८/२०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर अपलोड करणेत याव्यात. प्राप्त निविदा दि. ०५/०८/२०१७ रोजी स. ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांनी राखून ठेवला आहे, याबद्दलचा निर्णय अंतिम व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
(प्रमोद कुलकर्णी)
शहर अभियंता,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

कडोंमपा/जसंवि/मुका/४३४
दि. २७/७/२०१७

हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
प्रॉक्यूरमेंट - प्रकल्प आणि पाईपलाईनस्
दक्षिण पाईपलाईन प्रकल्प (बेंगलोर कार्यालय)

नोंदणीकृत कार्यालय : १७, जमशेदजी टाटा रोड, मुंबई ; सीआयएन:एल२३२०१एमएच१९५२जी०१०००८५८

ई-निविदा सूचना आमंत्रण

मेसर्स वॉर्ले पार्सन्स यांच्या वतीने आणि एचपीसीएल यांनी डिजीटल स्वाक्षरीकृत आणि मोहोरबंद (एनक्रीप्टेड) ई-निविदा दोन बोली प्रणालीतून (ऑनलाईन बोली केवळ https://etender.hpcl.co.in या संकेतस्थळावरच सादर करावयाच्या आहेत) मागवण्यात येत आहेत.

निविदा क्र.	निविदा विवरण	बोली सादर करण्याची अंतिम तारीख
१७०००१८-एचडी-१९९९४	व्हिव्हिएसपीएल कर्पोसिटी ऑगमेंटेशन प्रोजेक्टसाठी मोटर ऑपरेटेड व्हॉल्वचा पूरवठा करणे	२८.०८.२०१७ पासून १५.०० वा. भारतीय प्रमाण वेळेनुसार

संपूर्ण निविदा दस्तऐवजासह ईएमडी, बोली पात्रता निकष (बीक्यूसी) इ., आमच्या www.hindustanpetroleum.com या संकेतस्थळावर निविदा सेक्शन अंतर्गत 'टेंडर्स अँड कॉन्ट्रॅक्ट्स' लिंक वर पाहू शकता. उपरोक्त निविदाधारकांसाठी वरील निविदेसंबंधीत पुर्नआवृत्त्या, स्पष्टीकरण, शुध्दीपत्र, परिशिष्ट आणि वाढीव कालावधी आदींसाठी फक्त एचपीसीएलच्या संकेतस्थळावर ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. बोलीधारकांनी स्वत:ला अद्ययावत ठेवण्यासाठी नियमितपणे या संकेतस्थळाला भेट द्यावी.

व्यवस्थापक - प्रॉक्यूरमेंट

हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सीआयएन: एल२३२०१एमएच१९५२जी०१०००८५८

केंद्रिय प्रॉक्यूरमेंट विपणन
वैश्विक ई-निविदा सूचना आमंत्रण

एचपीसीएल - सीपी (एम) खालील ई-निविदांसाठी पात्रताधारक बोलीदारांकडून बोली आमंत्रित करण्यात येत आहे.

निविदा क्र.	निविदा विवरण	बोली सादर करण्याची तारीख	आमचा संपर्क
१७०००११०-एचडी-१०००२	भारतातील एचपीसीएलच्या विविध ठिकाणच्या क्रॉस कंट्री पाईपलाईनसाठी ड्रॅग रीब्यूसींग एजंटस्ची खरेदी करण्यासाठी वैश्विक निविदा	१८ ऑगस्ट २०१७ पासून १५०० वाजता.	०२२-२२६३८५३० /१९

निविदा तपशिल खालील संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येतील.
१. www.hindustanpetroleum.com/TendersAndContracts
२. एचपीसीएल ई-निविदा संकेतस्थळ : https://etender.hpcl.co.in
३. सेंट्रल प्रॉक्युरमेंट पोर्टल : http://eprocure.gov.in/cppp (४८ तासानंतर)
सर्व तपशील, पुनरीक्षण, शुध्दीपत्रक, जोडणी इत्यादी, निविदा फक्त वरील संकेतस्थळावर होस्ट केल्या जातील. पात्रता मापदंड पूर्ण करणाऱ्या बोलीधारक https://etender.hpcl.co.in या संकेतस्थळावर लॉग इन करुन भाग घेऊ शकतात.

एचपीसीएल भारतातील सर्वाधिक लुब मार्केटर

एनबीसीसी (भारत) लिमिटेड
(फॉर्मली नॅशनल बिल्डींगस् कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन लि.)
(भारत सरकारचा उपक्रम)
सीआयएन : एल ७४८९९डीएल१९६०जीओआय००३३३५
मुख्य महाप्रबंधक कार्यालय (सीपीजी) यांचे कार्यालय, एनबीसीसी भवन, लोधी रोड, नवी दिल्ली -११०००३ (भारत).

वैश्विक ई-निविदा सूचना आमंत्रण

एनआयटी क्र. : एनबीसीसी/सीपीजी/आयटीपीओ/नवी दिल्ली/२०१७/९४ **दिनांक : २५.०७.२०१७**

एनबीसीसी (इंडिया) लिमिटेड ने एनआयटीच्या क्लॉज २.० मध्ये नमूद केल्यानुसार पात्रता निकष पूर्ण केलेल्या पात्र अर्जदारांकडून **आयटीपीओ कॉम्प्लेक्सच्या पुनर्विकासासाठी प्रगति मैदान, नवी दिल्ली येथे एकात्मिक प्रदर्शन-सह-कन्व्हेन्शन सेंटर (आयईसीसी)** मध्ये डिझाईन, इंजिनियरिंग, प्रोक्योरमेंट आणि कन्स्ट्रक्शन (ईपीसी) आधारावर ऑपरेशन आणि मेन्टनन्ससाठी वैश्विक खुली ई-निविदा आमंत्रित केली आहे. या कामाचा अंदाजित प्रकल्प खर्च : **रु. १६७००.०० लाख (भारतीय रुपये);** बोली सादर करण्याची अंतिम तारीख : **२४.०८.२०१७;** पूर्तता कालावधी : **२४ महिने.**
संबंधीत तपशिलवार एनआयटीची माहिती www.tenderwizard.com/NBCC आणि www.eprocure.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून शुध्दीपत्रक / जोडणी जर असल्यास फक्त वरील संकेतस्थळावर सांगण्यात येईल आणि प्रसिध्द करण्यात येणार नाही.

मुख्य महाप्रबंधक (सीपीजी)

भारतीय सौर ऊर्जा निगम लि.
(भारत सरकार का उद्यम)
ए विंग, पहला तल, डी-३, डिस्ट्रिक्ट सेंटर, साकेत, नई दिल्ली-110017
सीआईएन: यू40106डीएल2011एनपीएल225263

नि.आ.सू. सं.: सेकी/एसडी/एनआईटी/2017/पीएमडीपी जेएंडके दिनांक: 27/07/2017

भारतीय सौर ऊर्जा निगम लि. (सेकी), लद्दाख नवीकरणीय ऊर्जा विकास एजेंसी (एलआरईडीए) तथा कारगिल नवीकरणीय ऊर्जा विकास एजेंसी (केआरईडीए) की ओर से, जे एंड के के लिए प्रधानमंत्री विकास पैकेज के अंतर्गत जम्मू और कश्मीर के लेह और कारगिल जिलों के विभिन्न स्थानों पर 14MW सौर पीवी तथा 42MWh ऊर्जा भंडारण की संचयी क्षमता के साथ 3 घंटे ऊर्जा भंडारण के लिए बैटरी ऊर्जा भंडारण प्रणालियों (बीईएसएस) की सुविधा सहित सौर पीवी बिजली परियोजनाओं के विभिन्न आकारों के डिजाइन, इंजीनियरिंग, निर्माण, आपूर्ति, इरेक्शन, परीक्षण, कमीशनिंग और ओएंडएम हेतु मोहरबंद निविदाएं आमंत्रित करती है। विस्तृत निविदा आमंत्रण सूचना संबंधित दस्तावेज़ डाउनलोड के लिए 31.07.2017 से उपलब्ध रहेंगें।

इच्छुक निविदादाताओं से इस निविदा से संबंधित अपडेट हेतु www.seci.gov.in और www.tcil-india-electronictender.com वेबसाइटों को देखनें का अनुरोध किया जाता है क्योंकि अलग से कोई और अधिसूचना जारी नहीं कि जाएगी।

इस निविदा से संबंधित किसी पूछताछ के लिए आप फोन नं.: 011-71989239 / 230 पर हम से संपर्क कर सकते हैं या projects@seci.gov.in पर हमें ई-मेल कर सकते हैं।

"स्वच्छ भारत - स्वच्छ ऊर्जा"

पश्चिम रेल्वे
शुद्धीपत्रक

जगजीवनराम हॉस्पिटल, मुंबई सेंट्रल इथे **०६ एचव्हीएस जागांकरता वॉक इन मुलाखती.** अर्जदारांना अशी विनंती की त्यांनी **११.०८.२०१७** ला खोली क्र. २२, तळमजला, जगजीवनराम हॉस्पिटल, मुंबई सेंट्रल ४०० ००८ इथे **१०.३० ते १२.३० दरम्यान** अर्ज सादर करावेत. 7

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
शुद्धीपत्रक

निविदा क्र. S&T/C/RTM/52/2017-18 दिनांकित २९.०६.२०१७ करता. वरील निविदेकरता खालीलप्रमाणे शुद्धीपत्रक असे आहे: **अनु. : १. सध्याचे टीडी :** सध्याच्या निविदा कागदपत्रांमध्ये CSTE/C/CCG पत्र क्र. Sg.32/0/CVol (VI) दि. १९.०७.२०१७ प्रमाणे नवीन ऐड-ऑन पॉलिसीमुळे. **बदललेले टीडी:** निविदा कागदपत्र बदलून संकेतस्थळावर अपलोड केलेले आहेत. **नोंद :** निविदा कागदपत्र बदलून अपलोड केलेले आहेत. वरील निविदा सूचनेच्या अधिक तपशिलांकरता कृपया www.ireps.gov.in या पश्चिम रेल्वेच्या संकेतस्थळाला भेट द्या. 3

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
शुध्दिपत्रक - I

निविदा सूचना क्र. एम १३७/१/१२/सीसीजी (एचवायडी. बफर), दि. ०४.०७.२०१७. कामाचे नाव : चर्चगेट : चर्चगेट स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर सध्याचे खराब झालेले हाइड्रोलिक बफरच्या जागी नवीन हायड्रॉलिक बफरच्या सेटसह पुर्नस्थापित करणे. ऑन टर्न की बेसिस **वर्णन :** सादर करण्याची अंतिम दिनांक आणि वेळ **तत्पुर्वी :** ०९.०८.२०१७ रोजी १५.०० वा. **असे वाचण्यात यावे :** २४.०८.२०१७ रोजी १५.००वा. **वर्णन :** उघडण्याची दिनांक आणि वेळ **तत्पुर्वी :** ०९.०८.२०१७ रोजी १५.३० वा. **असे वाचण्यात यावे :** २४.०८.२०१७ रोजी १५.३० वा. अन्य अटी बदललेले नाहीत. निविदा सूचना शुध्दीपत्रक आणि अधिक माहिती असल्यास कृपया आमच्या संकेतस्थळावर http://www.ireps.gov.in इथे भेट द्या. 6

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
टॅप परिवर्तकाचे पुनर्वसन

निविदा क्र.: ईएल/टीआरएस/बीएल/१६-१७ बल्क आरएसपी/टीएपी परिवर्तक (आर). ठिकाणासह कामाचे नाव: काम - कन्व्हेशनल इलेक्ट्रीक लोकोस टॅप परिवर्तकाचे पुनर्वसन @ रु. १४ लाख प्रत्येकी (बीएल - १० नग, बीआरसी - १० नग). **ठिकाण -** सिनी. डीईई/टीआरएस/डीएल इलेक्ट्रीक लोकोशेड, पश्चिम रेल्वे, वलसाड : ३९६ ००१ (गुजरात). **अंदाजित कामाची रक्कम :** रु. ३००५६७६०/, **ईएमडी :** रु. ३००२९०/-. **निविदा सादर करण्याची आणि निविदा उघडण्याची तारीख :** ०८.०९.२०१७ पर्यंत १५.०० वा. तर निविदा दि. ०८.०९.२०१७ रोजी १५.३० उघडण्यात येईल. **संबंधित संकेतस्थळ :** www.ireps.gov.in 2

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

मध्य रेल्वे
भाडेतत्त्वावर ट्रकस्

वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता (डिझेल), डिझेल लोको शेड, कुर्ला, मुंबई ४०००२४ आणि भारताचे राष्ट्रपती यांच्यावतीने खुली निविदा आमंत्रित करत आहेत. निविदा ई-निविदा प्रक्रियेनुसार फक्त www.ireps.gov.in या संकेतस्थळाव्दारे स्वीकारली जाईल. निविदा फक्त संकेतस्थळावर सादर करावे दि. **२९.०८.२०१७** रोजी **१४.००** वा. नंतर स्विकारली जाणार नाही. निविदा सादर करण्याच्या तारखेलाच **१४.३०** वाजता उघडण्यात येईल. निविदा उघडण्याच्या दिवशी बंद किंवा अनपेक्षित सुट्टी असल्यास निविदा पुढील कामकाजाच्या दिवशी उघडण्यात येईल. **कामाचे नाव / मात्रा :** कुर्ला येथील डिझेल लोकोशेडसाठी २ वर्षांकरीता ६.५ मे/टन क्षमतेचे भाडेतत्त्वावर ट्रकची आवश्यकता. **पुर्तता कालावधी :** २४ महिने **अंदाजित किंमत:** रु. १०,७१,०२४/-. **ईएमडी:** रु. २१,४३०/-. **निविदा अर्जाची किंमत :** रु. २,०००/-. नमूद केलेली निविदेची संपूर्ण माहिती www.ireps.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
खुली निविदा सूचना क्र. : एसडीएमई/डी/सीएलए/टीएच/१७-१९ दि. १९.०७.२०१७ 366

सुरक्षा मदतलाईन १८२

पश्चिम रेल्वे
विविध बांधकामाची कामे

उप मुख्य अभियंता (बांधकाम) I, पश्चिम रेल्वे, प्रतापनगर, वडोदरा, ३९०००४, खालील कामांकरीता ई - निविदा आमंत्रित करीत आहेत. **(१) i) ई-निविदा क्र. : डीवाय.सीई/सी/आय/बीआरसी//सीटीडी-धार/८९ ii) कामाचे नाव:** केएम ६५/० ते ७०/० खंडाळा ते जोबट स्टेशन दरम्यान अलीराजपूर - जोबट सेक्शन कनेक्शनसह छोटाउदेपूर - धार दरम्यान नवीन बीजी लाईनचे बांधकाम करण्यासाठी तसेच जमीनीवरील किनारी भागाचे काम, सर्व प्रकारच्या मातीचे कापणी / साधारण खडक / कडक खडक आणि योग्यप्रकारे आच्छादन, यार्डस्, ट्रॉली रेफ्यूजी आणि पूल मार्ग इत्यादी, आणि सामान्य पूलाचे बांधकाम, आरयूबीएस, साईड ड्रेन, टो वॉल्स, रीटेनींग वॉल्स आणि संरक्षक कामे इत्यादी. **iii) अंदाजीत कामाची रक्कम :** रु. १९८०.८८ लाख. **iv) ईएमडी :** रू. ११४०४४०/- **(२) ई - निविदा क्र. डीवाय.सीई/सी/आय/बीआरसी/एमवायजी - एसएमएलए/११ ii) कामाचे नाव:** लोटना येथील एमवायजी आणि एसएमएलए बायपासला (नवीन लाईन) (एकूण = ९६.४६ कि.मी.) मियागम ०.०० कि.मी. ते दाभोई कि.मी. ३२.३० कि.मी. आणि मियागम फ्लाय ओव्हर १.४५ कि.मी. ते ७.९८ कि.मी. सह यार्ड कनेक्शनसह गेज कन्व्हर्जनसाठी (एनजी ते बीजी) ५० एमएम गेज मशिन क्रश बॅलास्ट इन सेसचा पूरवठा करणे. **iii) अंदाजित कामाची रक्कम :** रु. ९३५.४१ लाख, **iv) ईएमडी :** रु. ६७०६८/-. **बोलीसाठी ऑनलाईन निविदा उपलब्ध : पासून:** १७.०८.२०१७ रोजी ११.०० वा. ते ३१.०८.२०१७ रोजी १५.०० वा. **पर्यंत उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** ३१.०८.२०१७ रोजी १५.३० वा. **vi)** संबंधित तपशिलवार निविदा दस्तऐवज (विना परतावा), ईएमडी, पात्रता निकष, कामाचे समान स्वरुप, तपशीलवार निविदा अटी, कृपया
www.ireps.gov.in आणि
www.wr.indianrailways.gov.in येथे भेट द्या
आणि मॅन्यूअल प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही. 5

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

Pidilite **PIDILITE INDUSTRIES LIMITED**

FEVICOL | DR. FIXIT WATERPROOFING EXPERT | ONE DROP INSTANT ADHESIVE Fevi kwik | M-seal | fevi stik super

**EXTRACT OF STANDALONE & CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED